https://lokshastranews.com

वरील लिंकवर
आणखी बातम्या

सामाजिक, राजकीय आणि प्रासंगिक घडामोडीचे स्वतंत्र वेब पोर्टल...

# लोकशास्त्र न्यूज

https://lokshastranews.com

स्वतंत्र मराठी बातमीपत्र

वर्ष - पहिले
अंक क्र.- १०
पाने - ४

संपादक - भाऊसाहेब हुजबंद मो.८९९९२१९९४ | * शनिवार - दि. २८ जून २०२५ | Email. - hujbandbm2023@gmail.com

# श्री क्षेत्र भीमाशंकर विकास आराखड्याची तातडीने अंमलबजावणी करावी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## रु. २८८.१७ कोटींच्या श्री क्षेत्र भिमांशंकर विकास आराखड्यास मान्यता

मुंबई, दि. २७ : श्री क्षेत्र भीमाशंकर विकास आराखड्याची अंमलबजावणी तातडीने सुरु करुन कुंभमेळ्याच्या आधी या क्षेत्राचा सुनियोजितपणे दर्जेदार विकास करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

यावेळी श्री क्षेत्र भीमाशंकर विकास आराखडा (कुंभमेळा २०२७-गर्दी व्यवस्थापन व इतर सोयी सुविधा) रु. २८८.१७ कोटींच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली.

सह्याद्री अतिथिगृह येथे श्री क्षेत्र भीमाशंकर विकास आराखडा संदर्भातील आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यंत्रणांना निर्देश दिले. बैठकीस सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, आमदार दिलीप वळसे पाटील उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, श्री क्षेत्र भीमाशंकर या ठिकाणी मोठ्या संख्येने भाविक आणि पर्यटक येतात, त्यांना केंद्रबिंदू मानून याठिकाणी विविध दर्जेदार सुविधा विकसित कराव्यात. कुंभमेळा सुरु होण्यापूर्वी श्री क्षेत्र भीमाशंकर येथील विकासाची कामे पूर्ण करावी, त्यादृष्टीने विकास आराखड्याच्या अंमलबजावणीचा कालबद्ध कार्यक्रम तयार करावा, कालबद्ध कार्यक्रम ठरवून काम सुरू करण्यात यावी. भीमाशंकर परिसराला लाभलेल्या नैसर्गिक सृष्टीसौंदर्याची पार्श्वभूमी लक्षात घेऊन येथे व्यापक प्रमाणात इको टुरिझम संकल्पना विकसित करण्यात यावी. मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेल्या वनराईचा उपयोग करुन वनभ्रमण पथ तयार करावे. त्याचसोबत पर्यटक,भाविकांसाठी रोप वे ची सुविधा विकसित करावी. निगडाळे या ठिकाणी पर्यटकांसाठी सोयीच्या ठरणाऱ्या सर्व सुविधा हॉटेल, रेस्टॉरंट त्याचसोबत इच्छुकांसाठी निवास सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने नियोजन करावे. भीमाशंकर येथील दळण-वळण सुविधा, वाहतूक मार्ग, अंतर्गत रस्ते यांच्या विकासास प्राधान्य द्यावे. तसेच याठिकाणी हेलीपॅड सुविधा उपलब्ध करुन देण्याचेही नियोजन करावे. या परिसराचा विकास करताना स्थानिक व्यावसायिक, दुकानदारांना नवीन दुकाने उपलब्ध करुन द्यावीत. तसेच राजगुरुनगर-तळेघ-भीमाशंकर महामार्ग हा सुरळित वाहतूक व्यवस्थेसाठी उत्तम पर्याय आहे, त्यादृष्टीने त्याचा विकास करण्यात यावा. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर येथे पर्यटक भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता चोख सुरक्षा व्यवस्था ठेवावी, त्यासाठी अतिरिक्त पोलिस चौकी या परिसरात उभारावी. तसेच अखंडित वीज पुरवठा सुविधा उपलब्धतेच्या दृष्टीने वीज उपकेंद्र ही याठिकाणी द्यावे.

यावेळी पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी श्री क्षेत्र भीमाशंकरच्या विकासकामांबाबत सविस्तर सादरीकरण केले. बैठकीस वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी उपस्थित होते.

# बाळासाहेब सोनवणे यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर

## दि.२९ जून रोजी पुरस्कार वितरण

नाशिक:प्रतिनिधी - निफाड तालुक्यातील मांजरगाव येथील भूमिपुत्र, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी अधिकारी संघटना विभागीय अध्यक्ष तसेच महिरावणी येथील मातोश्री गि.दे.पाटील माध्यमिक विद्यालयाचे आदर्श व उपक्रमशील दिव्यांग उपशिक्षक म्हणून बाळासाहेब दादा सोनवणे यांना शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, दिव्यांग आदी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल नाशिक येथील मनु मानसी सेवाभावी संस्था आणि महावीर इंटरनॅशनल या संस्थेच्यावतीने जीवन गौरव पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आला आहे.


बाळासाहेब दादा सोनवणे सर

बाळासाहेब सोनवणे हे निफाड तालुक्यातील मांजरगाव येथील रहिवाशी असून नाशिक येथील ज्ञान साधना शिक्षण प्रसारक संस्थेत ३० वर्षापासून अध्यापनाचे कार्य करत आहेत. शिक्षकांबरोबरच महाराष्ट्र राज्य दिव्यांग संघटनेच्या माध्यमातून दिव्यांग कर्मचारी तसेच बेरोजगार यांना शासनाच्यावतीने सोई सवलती मिळवून देत २५ वर्षापासून दिव्यांग व निराधारांच्या समस्या सोडवत पुनर्वसन करण्याचे काम करत आहे. डॉ.एपीजे अब्दुल कलाम इंटरनॅशनलफाउंडेशनच्यावतीने जिल्हासमन्वयक म्हणून विद्यार्थी बालवैज्ञानिक बरोबरच मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करत आहे.

रविवार, दि. २९ जून रोजी दुपारी २.००वाजता जोशी नर्सरीजवळ, के के वाघ कॉलेज समोर,नाशिक येथे पुरस्कार वितरण सोहळा होणार असल्याची माहिती म्हणून मानसी संस्थेच्या संस्थापिका मेघा शिंपी आणि महावीर इंटरनॅशनल संस्थेचे अध्यक्ष अनिल नहार तसेच कार्याध्यक्षा मंजू जाखडी यांनी माहिती दिली आहे.तरी कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

# वारकऱ्यांना पिण्याच्या स्वच्छ पाण्यासह दर्जेदार आरोग्य सुविधा पुरवा – उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

मुंबई, दि. २७ : पंढरपूर येथे आषाढी वारीसाठी सर्व यंत्रणांनी परिपूर्ण नियोजन करावे. वारकऱ्यांना पिण्याचे स्वच्छ पाणी यासह आरोग्य व इतर सर्व दर्जेदार सुविधा पुरवाव्यात असे निर्देश विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी विधानभवन येथे पूर्वतयारी व नियोजन बैठक घेतली.

यावेळी सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर यांच्यासह जिल्ह्यातील संबंधित अधिकारी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.



पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरास पुरातन रुप देण्यासाठी शासनाने दिलेल्या निधीचा पूर्ण विनियोग करण्याच्या सूचना देऊन उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, मंदिरामध्ये वायुविजनाची योग्य सुविधा निर्माण करावी. विद्युतीकरणाचे काम दर्जेदार करावे. चंद्रभागेच्या पात्रामध्ये असलेल्या खंड्ड्यांचे मार्किंग करून त्यांना लालबावटा लावण्यासारख्या उपाययोजना कराव्यात. याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी. पंढरपूर शहरातील रस्त्यांवर पुरेशा प्रमाणात विजेचे खांब लावावेत. कोणताही कोपरा, रस्त्याचा शेवटचा भाग अंधारलेला राहणार नाही याची दक्षता घ्यावी. महिलांसाठी स्वच्छतागृहांची चांगली सोय उपलब्ध ठेवावी. परिवहन महामंडळाने गाड्यांचे योग्य नियोजन करावे. एस.टी. विषयी काही तक्रारी असल्यास तसेच एखाद्या महिलेस एसटी बस मधून प्रवास करताना काही अडचण असल्यास तक्रार करता यावी यासाठी हेल्पलाईन क्रमांक सुरू करावा आणि त्याची प्रसिद्ध सर्वत्र करण्यात यावी, अशा सूचनाही उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी दिल्या.

उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, वाहन चालकांना दिंडीतील वारकरी व्यवस्थित दिसावेत यासाठी रस्त्यांवर विद्युत दिव्यांची व्यवस्था करावी. शहरात वारी काळात स्वच्छता ठेवण्यासाठी योग्य नियोजन करावे. घाटांच्या दुरुस्तीचे सुरू असलेले काम लवकरात लवकर मार्गी लावावे. घाट बांधताना ते ज्येष्ठ आणि दिव्यांग यांनाही व्यवस्थित चढता आणि उतरता येईल अशा पद्धतीचे बांधावेत. भक्त निवासामध्ये दिव्यांग आणि ज्येष्ठ वारकऱ्यांसाठी रॅम्पची व्यवस्था करावी. वृद्ध, बालके आणि महिलांच्या सुरक्षिततेसाठी संबंधित विभागाने घाटांवर पथकांची नियुक्ती करावी. सफाई कर्मचाऱ्यांची चांगली व्यवस्था करावी. सर्व विभागांनी चांगली तयारी केल्याचेही सभापती डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

या बैठकीमध्ये स्वच्छता, पिण्याचे पाणी, वाहतूक, एसटी बस, घनकचरा व्यवस्थापन या बाबींचा आढावा घेण्यात आला.

# प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींच्या विसर्जनासंदर्भात दीर्घकालीन व पर्यावरणपूरक धोरण सादर करावे – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि. २७ : प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मोठ्या गणेश मूर्तींच्या विसर्जनासंदर्भात प्रथा, परंपरांचा मान राखत पर्यावरणाच्या दीर्घकालीन उपाययोजनांचा समावेश असलेले धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरणपूरक सण साजरे करण्यासंदर्भात आज सह्याद्री अतिथीगृहात बैठक झाली. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री ड.आशिष शेलार, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, महाधिवक्ता वीरेंद्र सराफ, मुख्यमंत्री यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, पर्यावरण विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, बृहन्मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अमित सैनी, प्रधान सचिव व विधी परामर्षी सुवर्णा केवले, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रभारी सदस्य सचिव रविंद्र आंधळे आदी उपस्थित होते.

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) गणेश मूर्तींच्या विसर्जनासंदर्भात न्यायालयाने निर्देश दिले आहेत. या निर्देशानुसार राज्य शासनाने राजीव गांधी विज्ञान तंत्रज्ञान आयोगाकडून अहवाल मागविला होता. आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांनी हा अहवाल दिला असून त्यात काही शिफारसी करण्यात आल्या होत्या. खोल समुद्रात मोठ्या मूर्तींचे विसर्जन करण्यासंदर्भात अभ्यास करणे आवश्यक आहे. त्याचा अभ्यास करून न्यायालयासमोर बाजू मांडण्यात यावी, असे निर्देश यावेळी देण्यात आले.


तसेच सार्वजनिक गणेश विसर्जनानंतर समुद्रकिनारे स्वच्छ करण्याची काळजी घेण्यासाठी ठोस उपाय आवश्यक आहेत, तसेच गणेशमूर्तीं तयार करताना पर्यावरणस्नेही सामुग्रीचा वापर व नैसर्गिक रंगाचा वापर करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले.

सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले की, सार्वजनिक गणेशोत्सव प्रथा परंपरेनुसार साजरा व्हावा. उंच व मोठ्या गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यासाठी पर्यावरणपूरक मार्ग काढण्यात यावा. तसेच छोट्या मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात करण्यात यावे. शाडूच्या व पर्यावरणपूरक सामग्रीचा वापर करून मूर्ती बनविण्यासंदर्भात जनजागृती करणे आवश्यक आहे.

डॉ. काकोडकर यांनी जल प्रदुषणाचा विचार करून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्यावर भर देण्यात यावा. रासायनिक रंगांमुळे जास्त प्रदुषण होते. त्यामुळे नैसर्गिक रंगाचा वापर करणे, पर्यावरणपूरक साहित्य वापरणे यावर भर देऊन जनजागृती करण्यासंदर्भात त्यांनी सूचित केले, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# कलाल-कलार समाजाचे भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळाचे घोडे अडले कुठे!

राज्यात काही समाजांनी कोणताही संघर्ष न करता त्यांना तडकाफडकी आर्थिक विकास महामंडळ प्राप्त झाले यांचेही आम्ही स्वागत करतो. कारणं यामुळे समाजाचा विकास होईल मग तो कोणताही समाज असो.परंतु गेल्या चार वर्षांपासून महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना आर्थिक विकास महामंडळासाठी संघर्ष करीत आहे व शासन दरबारी मागणी करीत आहे परंतु सरकार यावर दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते.कलाल-कलार समाजाला भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ मिळावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथराव शिंदे,अतुलजी सावे यांना लेखी निवेदन सुध्दा देण्यात आले. सोबतच इतरही मंत्र्यांना निवेदन देण्यात आले आणि याबद्दल चर्चा सुध्दा झाली व त्यांनी ठोस आश्वासन सुध्दा दिले तुमच्या समाजाचा हा महत्त्वाचा प्रश्न आहे त्यामुळे कलाल- कलार समाजासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात येईल.परंतु सरकार तर्फे आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी कोणत्याही प्रकारची अधिकृत कारवाई किंवा हालचाली अजून पर्यंत सरकार मार्फत करण्यात आलेली नाही याची खंत व दु:ख समाजाला आहे. समाजाने मंत्री महोदयांना समक्ष निवेदन दिलेच सोबतच मेल व्दारे अनेक पत्र व्यवहार सुध्दा केले परंतु कलाल-कलार समाजाच्या हाती निराशा आली.एककीकडे सरकार कलाल-कलार समाजाला आर्थिक विकास महामंडळापासुन डावलत आहे तर दुसरीकडे सरकारने जाहीर केलेल्या समाजाचे आर्थिक विकास महामंडळ समाजाच्या विकासासाठी कार्य करीत आहे.याची आम्हाला खंत वाटते. कोणताही समाज असो प्रत्येक समाजाचा विकास व्हायलाच पाहिजे.यासाठी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना नेहमीच स्वागतच करीत



आली आहे.सरकारने ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले याचे स्वागतच.या महामंडळाचे अध्यक्ष आशिषजी दामले महामंडळाच्या माध्यमातून समाजासाठी काय-काय करता येईल यावर गांभीर्याने विचार करून समाजाच्या प्रती विकासाची गती वाढविण्याचे काम करीत आहेत.दिनांक २२ जून २०२५ ला कराड येथे अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या सभेत त्यांनी प्रत्येक जिल्ह्यात परशुराम भवन उभारण्याची घोषणा केली सोबतच पारंपरिक व्यवसाय (पौरोहित्य )करणाऱ्यांना संधी देण्याकरिता पुढील पाऊल उचलण्याचे त्यांनी जाहीर केले.दामलेंच्या कार्याचे आम्ही स्वागत करतो कारण ते समाजाला पुढे नेण्याचे कार्य करीत आहेत.हीच संधी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेला सरकार का देत नाही? आम्हालाही वाटते की प्रत्येक जिल्ह्यात भगवान सहस्त्रार्जुन भवन बनावे व याचा फायदा समाजातील तळागाळातील गरीब समाज बांधवांना व्हावा.परंतु कलाल-कलार समाजाच्या प्रती सरकारचे घोडे कुठे अडले अजुन पर्यंत समजले नाही! आर्थिक विकास महामंडळाच्या बाबतीत पहिला हक्कदार कलाल-कलार समाज होता. परंतु सरकारने आर्थिक विकास महामंडळापासुन डावलल्याने समाज विकासापासुन दुरावल्या जात आहे.आज कलाल-कलार समाज अत्यंत मागासलेला आहे.कारण पारंपारीक व्यवसायांचा विचार केला तर फक्त १ टक्का पारंपरिक (मद्य) व्यवसाय आमच्या समाजाजवळ आहे व ९९ टक्के व्यवसाय पुंजीपती लोकांजवळ आहे त्यामुळे समाज पारंपरिक व्यवसायापासुन आजही कोसो दूर आहे.परंतु आज ९९ टक्के समाज बांधवांचे काय होईल याचा विचार सरकारने केला पाहिजे.समाजाच्या व्यथा आम्ही मंत्रीमहोदयांना समक्ष सांगितल्या सोबतच अनेक निवेदने सुध्दा दिलेत परंतु सरकार कलाल-कलार समाजाच्या प्रती उदासीन असल्याचे दिसून येते यामुळे समाज बांधवांच्या भावना दुखावल्या जात आहे. आताही वेळ गेलेली नाही सरकारने कलाल-कलार समाजाच्या व्यथा समजून घ्याव्यात व इतर समाजाप्रमाणे कलाल-कलार समाजासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून समाजाला विकासाच्या प्रवाहात आणावे अशी मागणी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या वतीने माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना करण्यात येत आहे.माननीय देवेन्द्रजी फडणवीस अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेत आहेत यामध्ये मुख्यत्वेकरून आणिबाणीच्या काळातील बंदिवानांची पेंशन दुप्पट करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे याचे स्वागतच याच धर्तीवर कलाल-कलार समाजाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून आपण एक पाऊल पुढे टाकुन कलाल-कलार समाजासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून समाजाचा विकासाचा मार्ग मोकळा करावा अशी आग्रहाची विनंती संघटनेच्या वतीने सरकारला करण्यात येत आहे.

**रमेश लांजेवार ( प्रदेश प्रवक्ता )**
**(महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना)**

# निफाडला शाहु महाराज जयंतिनिमित्ताने स्वारीप पक्षाच्या वतीने वही पेन वाटप



सागर निकाळे, निफाड प्रतिनिधी- लोकराजा राजर्षी शाहु महाराज जयंतिनिमित्ताने निफाडला स्वाभीमानी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आनंद आश्रममधील विद्यार्थ्यांना वही पेन वाटप करण्यात आले. स्वारीप शहरअध्यक्ष दादाराव काऊतकर यांच्या हस्ते शाहु महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. याप्रसंगी गौतम वानखेडे .सुरेंद्र पगारे, दादाराव पंडीत, दत्तु जाधव, जय काऊतकर, करण पाचपुते, गजु जाधव आदी मान्यंवर मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे इंदापूर तालुक्यात आगमन

पुणे, दि. २७: 'हीच व्हावी माझी आस, जन्मोजन्मी तुझा दास, पंढरीचा वारकरी, वारी चुको न दे हरी ' या भावनेसह, टाळ-मृदंगाच्या गजरात, 'ज्ञानोबा- माऊली तुकाराम'.रामकृष्ण हरी जय जय रामकृष्ण हरी अशा जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे आज इंदापूर तालुक्यात आगमन झाले. यावेळी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी

भवानीनगर येथे पालखी रथ आणि दिंड्यांचे दर्शन घेऊन स्वागत केले. यावेळी इंदापुरचे तहसीलदार जीवन बनसोडे, बारामतीचे तहसीलदार गणेश शिंदे, गट विकास अधिकारी डॉ. अनिल बागल, इंदापुरचे सचिन खुडे, यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# आपला सह-कलाकार हर्षदच्या जबरदस्त ऊर्जेचे आणि प्रतिभेचे शिवांगीकडून कौतुक

**लोकशास्त्र न्यूज...**

लोकांच्या आवडत्या 'बडे अच्छे लगते हैं' मालिकेच्या नव्या सीझनने लोकांचे कुतूहल जागवले आहे, केवळ त्यातील भावनिक कथानकाने नाही, तर हर्षद चोप्रा आणि शिवांगी जोशी यांनी साकारलेल्या ऋषभ आणि भाग्यश्री या प्रमुख जोडीमधील रोमँटिक केमिस्ट्रीने! त्यांच्या पडद्यावरील अभिनयाचे खूप कौतुक होत आहेच पण प्रेक्षक पडद्याच्या मागे दिसणाऱ्या त्यांच्या गुणांचे देखील गुण-गान करत आहेत.

या मालिकेत नायिकेची भूमिका करणाऱ्या शिवांगीने हर्षद सोबत काम करण्याचा अनुभव अलीकडेच शेअर केला आणि आपल्या या सह-कलाकाराचे भरभरून कौतुक केले. सेटवरचा अनुभव सांगताना ती म्हणते, हर्षद दररोज सेटवर इतकी ऊर्जा घेऊन येतो! त्याची कामाबाबतची निष्ठा आणि त्याच्यातील प्रतिभा दोन्ही प्रेरणादायक आहे. त्याच्या अभिनयात एक सहजपणा आहे. त्यामुळे आमची जी एकत्र दृश्ये आहेत, त्यात जान येते. हळूहळू आमच्यात छान सख्य झाले आहे. आमच्यात एक मोकळेपणा आहे, एकमेकांविषयी आदर आहे त्यामुळे आमच्या दृश्यांमध्ये भावनिक गहिरेपण आणणे तसे सोपे जाते.



या दोघांमधील केमिस्ट्री हा या मालिकेचा ठळक पैलू आहे. आणि हे स्पष्ट आहे की, पडद्याच्या मागे असलेल्या त्यांच्या सख्यामुळे पडद्यावर ते भावनिक क्षण उत्तम साकारू शकतात आणि ते प्रेक्षकांना आपलेसे वाटतात. मालिका उलगडत जाईल तसे या दमदार जोडीकडून आणखी जास्त हृदयस्पर्शी आणि रोमँटिक क्षण अनुभवता येतील अशी प्रेक्षकांना आशा आहे.

बघा, 'बडे अच्छे लगते हैं'चा नवा सीझन, दर सोमवार ते शुक्रवार रात्री ८.३० वाजता फक्त सोनी एन्टरटेनमेंट टेलिव्हिजन आणि सोनी लिव्हवर.

# जिजामाता गर्ल्स हायस्कूलमध्ये अंमली पदार्थ विरोधी दिन उत्साहात साजरा

सागर निकाळे, निफाड प्रतिनिधी -: मराठा विद्या प्रसारक समाज संचलित जिजामाता गर्ल्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, सटाणा येथे राजर्षी शाहू महाराज जयंती, महाकवी कालिदास यांची जयंती आणि अंमली पदार्थ विरोधी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे विधिपूर्वक पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या सौ. संगीता सोनवणे होत्या. यावेळी पर्यवेक्षक श्री. पवार सर, सर्व शिक्षक, शिक्षकेतर बंधू भगिनी, सर्व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उप-स्थित होत्या. राजर्षी शाहू महार-ाज यांच्या जीवनकार्याविषयी माहिती देताना विद्यालयाच्या उपशिक्षिका, श्रीमती. एम. एस. पाटील, श्रीमती.ए जे. पवार,यांनी त्यांच्या सामाजिक




न्यायासाठीच्या कार्यावर प्रकाश टाकला. त्यांनी शाहू महाराजांनी केलेल्या शैक्षणिक सुधारणांबद्दल विद्यार्थिनींना प्रेरणादायी उदाहरणे देत मार्गदर्शन केले. यानंतर अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त विद्यार्थिनींना व्यसनाधीनतेपासून होणारे दुष्परिणाम समजावून सांगण्यात आले. सामाजिक जाणीव व आरोग्याच्या दृष्टीने सजग राहण्याचे आवाहन करण्यात आले. विद्यार्थिनींना या विषयावर आधारित प्रतिज्ञा देण्यात आली आणि काही विद्यार्थिनींनी अनुभवकथनाद्वारे आपले विच-ारही मांडले. यावेळी महाकवी कालिदास जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ संस्कृत शिक्षिका श्रीमती. एम. एन. सूर्यवंशी यांनी कालिदास यांच्या साहित्यिक योगदानाची माहिती दिली. त्यांनी 'अभिज्ञान शाकुंतलम्', 'मेघदूत' यांसारख्या कालिदासांच्या अजरामर रचनांचा आढावा घेत विद्यार्थिनींना त्यांच्या लेखनशैलीची ओळख करून दिली. कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने झाली. कार्यक्रमाचे आयोजन व समन्वय विद्यालयातील शिक्षकवर्ग व विद्यार्थिनींच्या सहभागाने अत्यंत यशस्वीपणे पार पडले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थिनींमध्ये सामाजिक जाणीव, सांस्कृतिक अभिमान व मूल्यशिक्षण यांची वृद्धी होत असल्याचे मत यावेळी अनेक शिक्षकांनी व्यक्त केले.

# दिव्यांग व्यक्तींना सर्व क्षेत्रात संधी मिळणे आवश्यक - मंत्री छगन भुजबळ

नाशिक, दि.२७ जून : दिव्यांग व्यक्तींना शिक्षण, रोजगार, आरोग्य, सरकारी सेवा, आणि सर्वसामान्य नागरिक म्हणून सन्मान मिळणे गरजेचे आहे. त्यांच्या सक्षमीकरणासाठी सर्व क्षेत्रात संधी मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

आज येवला शहरातील राधाकृष्ण लॉन्स येथे एलिम्को मार्फत आयोजित अस्थिव्यंग प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम हातपाय बसविणे, कॅलिपर्स व तत्काळ नि:शुल्क वितरण शिबिरात ते बोलत होते. उपविभागीय अधिकारी बाबासाहेब गाढवे, तह-सीलदार आबा महाजन, नगरपालिकेचे मुख्याधिकारी तुषार आ-हेर, गटविकास अधिकारी संदीप वायाळ, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी वंदना शिंपी, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी भारत चौधरी, तालुका कृषी अधिकारी शुभम बेरड, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शरद कातकडे, संजय कुसावळकर यांच्यासह अधिकारी उप-स्थित होते. मंत्री श्री. भुजबळ म्हणाले की, दिव्यांग व्यक्तीना समाजाच्या मुख्यप्रवाहात आणण्यासाठी एलिम्को मार्फत आयोजित हा उपक्रम प्रशंसनीय असून संवेदनशीलता व सामाजिक



बांधिलकीची साक्ष आहे. समाजात विविध कारणांमुळे काही व्यक्तींना शारीरिक अपंगत्वाचा सामना करावा लागतो. अपघात, जन्मतः दोष, किंवा काही आजारांमुळे अनेक जण हात, पाय, ऐकण्याची किंवा बोलण्याची क्षमता गमावतात. या शारीरिक मर्यादा दिव्यांग व्यक्तीच्या शिक्षणात, नोकरीत, प्रवासात, समाजातील सहभागात त्यांच्या आयुष्यात अडथळे निर्माण करतात. त्यामुळे या शिबिराच्या माध्यमातून या व्यक्तींचे पुनर्वसन करणे त्यांच्या आत्मविश्वासाला बळ देण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे मंत्री श्री. भुजबळ यांनी सांगितले. शासनाने दिव्यांग व्यक्तींसाठी विविध योजना राबवल्या आहेत. दिव्यांगजन सशक्तीकरण योजना, -डखचउज या भारत सरकारच्या संस्था, तसेच सामाजिक न्याय विभाग, जिल्हा प्रशासन यांच्याद्वारे अनेक उपक्रम राबवले जात आहेत. या योजनांचा उद्देश केवळ सहाय्य करणे नाही, तर दिव्यांग व्यक्तींना सक्षम बनवणे, त्यांना आत्मनिर्भर बनवणे आणि त्यांच्या गुणवत्तेचा समाजाच्या विकासात उपयोग करून घेणे आहे. आजच्या शिबिरात कृत्रिम पाय, कृत्रिम हात, व्हीलचेअर, ट्रायसायकल, हियरिंग एड्स, वॉकर, काठी इत्यादींची मोफत तपासणी व वाटप करण्यात येत आहे. यासाठी जिल्हा प्रशासन, डॉक्टरांची टीम, तांत्रिक सहाय्यक, आणि सामाजिक संस्था यांनी एकत्रितपणे प्रयत्न केले आहेत, असे मंत्री श्री. भुजबळ यांनी सांगितले.

***

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर लोकाभिमुख उपक्रम- मंत्री छगन भुजबळ




नाशिक, दि.२७ जून : छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर हा महत्त्वाचा व लोकाभिमुख उपक्रम शासनाकडून सुरु करण्यात आला असून हे अभियान नागरिकांच्या महसूल संबंधित तक्रारी व तक्रारींचे निराकरण करण्यासाठी राबवले जात आहे, असे प्रतिपादन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

येवला शहरातील माऊली लॉन्स येथे तहसील कार्यालय येवला आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी बाबासाहेब गाढवे, तहसीलदार आबा महाजन, नगरपालिकेचे मुख्याधिकारी तुषार आहेर, गटविकास अधिकारी संदीप वायाळ, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी वंदना शिंपी, कृषी अधिकारी शुभम बेरड, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.शरद कातकडे, संजय कुसावळकर यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. मंत्री श्री. भुजबळ म्हणाले की, जिल्ह्यात महाराजस्व अभियान राबविण्यात येत असून या अभियानाच्या माध्यमातून महसूल विभागाशी निगडित प्रश्न निकाली काढून नागरिकांच्या सोयीचे आहे. यात शेतकरी बांधवासाठी ७/१२ उत-ारा दुरुस्ती, फेरफार नोंदी,वारस नोंद, जाती,उत्पन्न,राहिवासी दाखले, जुने दस्त नोंदवही व पडताळणी,मालमत्ता नोंदणी, जमिनीचे वर्गीकरण व मोजणी यासह विविध योजनांचे लाभ, दाखले नागरिकांना उपलब्ध करून दिले जात आहेत. हे अभियान एक दिवसा-पुरते मर्यादित न ठेवता, गावोगावी, तालुक्याच्या पातळीवर, नियमितपणे आणि संपूर्ण सहभागासह राबविले जावे. तसेच प्रत्येक प्रलंबित प्रकरणाचा निकाल वेळेत, न्यायाने आणि पारदर्शकतेने दिला गेला पाहिजे हीच खरी जनतेची सेवा असल्याचे मंत्री श्री. भुजबळ यांनी यावेळी सांगितले.

उप विभागीय अधिकारी श्री. गाढवे यांनी प्रास्ताविक केले.

***

## जगाला मार्गदर्शक ठरेल असे काम शाहू महाराजांनी केले – प्रा. शरद शेजवळ

# येवला महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त विशेष व्याख्यान

सागर निकाळे, निफाड -राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे प्रगतिशील आणि समाजहितैषी शासक होते. ते सामाजिक न्यायाचे अग्रदूत आणि वंचितांचा खऱ्या अर्थाने कैवार घेणारे राजे होते. त्यांनी जगाला मार्गदर्शक ठरेल असे काम केले, असे प्रतिपादन प्रा. शरद शेजवळ यांनी केले. ते महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला व वाणिज्य महाविद्यालय येवला येथे बोलत होते. महाविद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन केले होते. सदरील कार्यक्रमात बोलताना पुढे ते म्हणाले की, राजर्षी शाहू महाराज हे सामाजिक समता, शिक्षण हक्क आणि सामाजिक न्याय याचे आद्य प्रवर्तक होते. त्यांनी बहुजन उद्धाराचे काम केले. सर्व स्तरातील लोकांसाठी मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. अस्पृश्य म्हणून हिणविलेल्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आपल्या संस्थानात आरक्षण धोरण लागू केले. माणूस हा कर्मावरून मोठा असतो जन्मावरून नव्हे असे म्हणत



तथाकथित जातव्यवस्था त्यांनी अमान्य केली. शिक्षण हेच खरे बळ आहे असे ते मानत. समता, बंधुता आणि न्याय हेच खरे धर्माचे तत्व असले पाहिजे असे शाहू महाराजांनी सांगितले. शाहू राजांनी लोकशाहीची पायाभरणी केली असेही शेजवळ म्हणाले. तसेच आपण संतांना, सुधारकांना, महामानवांना जातीजातीमध्ये बंदिस्त करत असल्याची, जात मानसिकता पुन्हा बळकट होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. आपल्या धडावर आपलेच डोके ठेवून फुले-शाहू-आंबेडकरांनी, छत्रपती शिवाजी महाराजांनी सांगितलेला मार्ग आपण सोडू नये असा सल्लाही त्यांनी उपस्थितांना दिला. सदरील कार्यक्रम प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गमे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. गमे म्हणाले की, छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना मिळालेल्या अल्प आयुष्यात कामाचा भला मोठा डोंगर उभा केला. त्यांनी सामाजिक न्यायाची बाजू जोरकसपणे लाऊन धरली. सामाजिक सुधारणांबरोबरच शेतकऱ्यांचे हक्क व न्याय त्यासाठी अनेक कृषी सुधारणा केल्या. शाहू महाराज हे सामाजिक समता, सामाजिक न्याय आणि सामाजिक शिक्षण याचे प्रेरणास्थान होते असेही ते म्हणाले. यावेळी मंचावर उपप्राचार्य डॉ. रवींद्र ठाकरे, कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा. वैभव सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रवींद्र ठाकरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रामप्रसाद वाव्हळ यांनी केले तर आभार डॉ. निलेश नाईक यांनी मानले.

***

# 'संवादवारी'च्या प्रदर्शनाला सणसर येथे वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे, दि.२७: डोक्यावर विठ्ठल-रुखमाईची मूर्ती, तुळशी वृंदावन, हातात टाळ, वीणा, भागवत धर्माचा पताका हाती घेत पांडुरंगाच्या दर्शनाच्या ओढीने पंढरपूरकडे मार्गस्थ वारकऱ्यांची पाऊले माहिती व जनसंपर्क महासंचालनालयच्या 'संवादवारी'कडेही वळत आहेत.

जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासोबत आयोजित 'संवादवारी' उपक्रमाअंतर्गत प्रदर्शन, चित्ररथ, एलईडी व्हॅन , कलापथक, पथनाट्याच्या माध्यमातून शासकीय योजनांचा जागर सुरू आहे. यापूर्वी कदमवाकवस्ती, लोणी काळभोर, यवत, वरवंड, उंडवडी गवळ्याची, बारामती आणि सणसर येथे या उपक्रमाला वारकरी व ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

चित्ररथाचे विशेष आकर्षण

पालखी सोहळ्यासोबत असलेला चित्ररथही वारकऱ्यांसाठी विशेष आकर्षण आहे. अनेक ठिकाणी वारकरी चित्ररथासोबत छायाचित्र घेताना दिसत आहेत. चित्ररथावर दर्शनी भागावरील लामणदिवा, तुळशी वृंदावनाची प्रतिमा असल्याने वारीसोबत असलेल्या भाविकांची पावले चित्ररथाकडे वळतात.

चित्ररथरथाची रचना आणि त्यावर



कलात्मकतेने दिलेली माहिती वारकरी बांधव कुतूहलाने पाहत आहेत. कलापथकाच्या सादरीकरणाला टाळ्या मिळत असून योजनांची माहिती व मनोरंजन अशी सांगड घातली जात आहे.

वारीसोबत चालणाऱ्या एलईडी व्हॅनवरील मोठ्या पडद्यावर दृकश्राव्य चित्रफीतीच्या माध्यमातून योजनांची माहिती दिली जात आहे. लोककला पथकाच्या माध्यमातून ठिकठिकाणी भजन, विठुनामाच्या गजरासोबत रंजक पद्धतीने शासकीय योजनांची माहिती दिली जाते आणि त्यासोबत स्वच्छता आणि आरोग्याचे संदेशही देण्यात येतात. त्यामुळे या पथकासभोवतीही गर्दी दिसून येत आहे.

वारकरी आणि नागरिक प्रदर्शनाला आवर्जुन भेट देत असून योजनांची माहिती जाणून घेत आहेत. प्रदर्शनाची मांडणी आणि मिळणाऱ्या नवीन माहितीमुळे प्रदर्शनाला चांगला प्रतिसाद मिळतो आहे.

प्रदर्शनास भेट देणाऱ्या वारकऱ्यांना योजनांची माहिती देणारे पत्रके वितरण करण्यात येत आहेत. इंदापूर तालुक्यात २८ जून रोजी निमगाव केतकी आणि २९ जून रोजी इंदापूर पालखी तळ येथे प्रदर्शन आयोजित करण्यात येणार असून या प्रदर्शनाचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

प्रदर्शनात विविध योजनांची माहिती

प्रदर्शनात ३० फ्लेक्स पॅनेलचा समावेश आहे. पशुसंवर्धन विषयक किसान क्रेडिट कार्डची सुविधा पशुपालकांना देणे, पशुधन अभियानांतर्गत उद्योजकता विकासाला चालना, बळीराजा शेतकऱ्याच्या उन्नतीसाठीच्या योजना व घेतलेले निर्णय, नागरिकांना भेसळविरहित अन्नधान्य मिळावे यासाठी सुरक्षित अन्न तपासणीच्या सुविधा, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, कृषी योजनांच्या लाभासाठी ग्रीस्टॅक नोंदणी, 'महाविस्तार-एआय' प, सायबर सुरक्षितता, जलसिंचनासाठीचे प्रकल्प, सामाजिक न्यायासाठी मंत्रालयात ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापना, तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण आणि कल्याणकारी मंडळाची पुनर्रचना, आदिवासींच्या उत्थानासाठी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना, प्रधानमंत्री आवास योजना टप्पा २ अंतर्गत ३० लाख घरे मंजूर, पीएम- जनमन, रमाई, शबरी, अटल बांधकाम कामगार वसाहत, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, मोदी आवास योजना आदी योजनांची माहिती देण्यात आली आहे.

याशिवाय पशुसंवर्धन अंतर्गत मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना, राज्य स्तरावर कॉल सेंटरची स्थापना, पशु आरोग्य सेवांसाठी टोल फ्री क्रमांक, सहकार विभागांतर्गत आपले सहकार पोर्टलवर सहकार विभागाच्या ऑनलाईन सेवा उपलब्ध, परिवहन विभागांतर्गत महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृह योजना, गोवारी बांधवांच्या विकासासाठी स्वतंत्र योजना, दिव्यांगणसाठी स्वतंत्र विभाग, उच्च व तंत्र शिक्षण अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी आदी माहिती या प्रदर्शनात फ्लेक्स पॅनेलवर प्रदर्शित करण्यात आली आहे.

'लोकशास्त्र न्यूज' हे बातमीपत्र सोशल मिडियाद्वारे प्रकाशित होत असते. * अंकात प्रकाशित होणाऱ्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
लोकशास्त्र न्युज कार्यालय पत्ता - फ्लॅट नं. १५, श्रीहरी दर्शन सोसायटी, डोंगरगाव रोड, विंचूर, ता. निफाड, (नाशिक) पिन-४२२३०५